क्रमांक :- प्रलि/लेखा/भनिनि/13908/२०१६
पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर
दिनांक :- २९/१२/२०१६

**संदर्भ :-** महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम १९९८

**विषय :-** भविष्य निर्वाह निधी परतावा/ना-परतावा अग्रिम मंजुरी बाबत...

--००--

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम १९९८ मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या मासिक वेतनातुन दरमहा त्याच्या मुळ वेतना पेक्षा जास्त नाही व मुळ वेतनाच्या ६% पेक्षा कमी नाही इतक्या रकमेची वर्गणी कपात करणेत यावी. भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदाराला खालील नमुद नियमानुसार व परिस्थितीत आपल्या जमा भविष्य निर्वाह निधीतुन खालील प्रमाणे भविष्य निर्वाह निधी परतावा किंवा ना-परतावा अग्रिम मिळु शकतो.

**(१) परतावा अग्रिम :-**

वर्गणीदारास खालील नमुद कारणांसाठी त्याच्या भविष्य निर्वाह निधीमधुन परतावा अग्रिम मिळु शकतो. सदर रकमेची परतफेड मंजुरी प्राधिकारी निर्देश देईल तितक्या समान मासिक हप्त्यामध्ये करण्यात येईल, परंतु वर्गणीदारानेच तशी मागणी केलेली नसेल तर अशा हप्त्यांची संख्या १२ पेक्षा कमी असणार नाही आणि २४ पेक्षा अधिक होणार नाही. जर अग्रिम रक्कम तीन महिन्याच्या मासिक वेतनापेक्षा जास्त होईल तर मंजुरी प्राधिकारी अशा हप्त्यांची संख्या ३६ पेक्षा अधिक होणार नाही अशी निश्चित करेल.

| अ.क्र. | नियम | कारण | मिळणारी रक्कम | परतफेड |
|---|---|---|---|---|
| १. | १३ (१) (अ) | आजारपण, प्रसुती किंवा विकलांगता यासंबंधीचा खर्च भागविण्यासाठी | तीन महिन्याच्या वेतनापेक्षा (मुळ वतन) अधिक नसेल किंवा त्यांच्या खाती असलेल्या शिल्लक रकमेच्या ५०% यापैकी जी कमी असेल ती रक्कम | कमाल २४ हप्ते जुने व नवे अग्रिम एकत्र करुन ३६ हप्ते **१२ हप्ते वसुल झाल्या शिवाय दुसरे परतावा अग्रिम देय नाही** |
| २. | १३ (१) (ब) | उच्च शिक्षण | | |
| ३. | १३ (१) (क) | वाड:निश्चय किंवा विवाह किंवा इतर धार्मीक कार्यक्रम | | |
| ४. | १३ (१) (ड) | दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी | | |
| ५. | १३ (१) (इ) | एखाद्या अभिकथित कार्यालयीन गैरवर्तनाच्या किंवा त्याच्या विरुद्ध दाखल करण्यात आलेल्या एखाद्या दाव्याच्या चौकशीत स्वत:चा बचाव करणेसाठी विधी व्यावसायिक नेमला असल्यास त्याचा खर्च भागविणेकामी | | |
| ६. | १३ (१) (फ) | आपली पदीय कर्तव्ये पार पाडील असतांना कोणत्याही बाबींच्या संबंधात एखाद्या खाजगी पक्षकाराने वर्गणीदाराविरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी | --//-- | --//-- |
| ७. | १३ (१) (ग) | घराच्या किंवा सदनिकेच्या किंवा एखाद्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी एखाद्या भूखंडाचा खर्च भागविण्यासाठी किंवा राहज असलेल्या नविन बांधकाम करणे/बांधकामात भर घालणे/ दुरुस्ती करणे कामी | --//-- | --//-- |
| ८. | १३ (१) (ड) | दूरचित्रवाणी संच किंवा प्रशीतक किंवा कपडे धुण्याचे यंत्र किंवा सूर्यचूल (सोलर कुकर) खरेदी | --//-- | --//-- |

(२) ना-परतावा अग्रिम :-

वर्गणीदारास खालील नमुद कारणांसाठी त्याच्या भविष्य निर्वाह निधीमधुन नापरतावा अग्रिम मिळु शकतो. त्या बाबतच्या सेवा शर्ती त्यांचे समोर दर्शविणेत आल्या आहेत.

| अ.क्र. | नियम | कारण | मिळणारी रक्कम | सेवा शर्ती |
|---|---|---|---|---|
| १. | १६ (अ) (१) | उच्चशिक्षणाचा खर्च | शिल्लक रकमेच्या ३/४ पेक्षा जास्त नाही | २० वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती १० वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा प्रत्येक वर्षी काढता येईल |
| २. | १६ (अ) (२) | वाड:निश्चय किंवा विवाह | --//-- | २० वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती १० वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा |
| ३. | १६ (अ) (३) | औषधोपचार | --//-- | --//-- |
| ४. | १६ (ब) (१) | राहण्यासाठी योग्य असे घर किंवा सदनिका बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी तयार सदनिका घेण्यासाठी यात जागेच्या खर्चाचा समावेश आहे | --//-- | १० वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती १० वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा २ ते ४ हप्त्यामध्ये |
| ५. | १६ (ब) (२) | राहण्यासोग्य असे घर बांधण्यासाठी किंवा घेण्यासाठी किंवा तयार सदनिका घेण्यासाठी घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल अशा कर्जाच्या रकमेची परतफेड करणेसाठी | --//-- | --//-- |
| ६. | १६ (ब) (३) | राहण्यासाठी घर बांधण्याकरिता जागा घेण्यासाठी किंवा या प्रयोजनार्थ घेतलेले कर्ज असे जेथे स्पष्टपणे म्हटलेले असेल, अशा कोणत्याही कर्जाची उर्वरित रक्कम फेडण्यासाठी | --//-- | --//-- |
| ७. | १६ (ब) (४) | पूर्वीपासुन वर्गणीदाराच्या मालकीच्या असलेल्या किंवा घेतलेल्या घराची किंवा सदनिकेची पुर्नरचना किंवा त्यात भर घालणे त्यात फेरफार करणे किंवा दुरुस्ती करणेसाठी | --//-- | --//-- |
| ८. | १६ (ब) (५) | कामाच्या ठिकाणाव्यतिरीक्त अन्यत्र वडिलोपार्जीत घराचे अथवा शासनाकडुन कर्ज घेऊन कामाच्या ठिकाणाव्यतीरिक्त अन्यत्र बांधलेल्या घराचे नवीकरण त्यात भर घालणे किंवा फेरफार करणे अथवा दुरुस्ती करणेसाठी | --//-- | --//-- |
| ९. | १६ (ब) (६) | नियम १६ (ब) (३) अन्वये खरेदी केलेल्या जागेवर घर बांधण्यासाठी | --//-- | --//-- |
| १०. | १६ ( क) | शेतीसाठी जमीन किंवा व्यवसायाकरिता जागा खरेदी किंवा दोन्ही प्रयोजनासाठी | --//-- | सेवानिवृत्तीस एक वर्ष शिल्लक असतांना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | १६ (इ)<br>१८ टिप २, ३ | मोटार गाडी खरेदी | सहा महिन्याचे वेतन/ रु.५००००/- किंवा प्रत्यक्ष रक्कम यापैकी जे कमी असेल ते | १५ वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती ५ वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा मुळ वेतन किमान रु.३५०० (असुधारीत) संपुर्ण सेवेत एकदाच |
| १२. | १६ (फ)<br>१८ टिप २, ३ | मोटार सायकल खरेदी | रु.४५०००/- शिल्लक रकमेच्या ५०%/ प्रत्यक्ष किंमत जी कमी असेल ती | १५ वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती ५ वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा मुळ वेतन किमान रु.१५०० (असुधारीत) संपुर्ण सेवेत एकदाच |
| १३. | शासन निर्णय दि. ०७/०७/०४ | संगणक खरेदी | रु.५००००/- किंवा शिल्लक रकमेच्या ३/४ रकमेपर्यंत किंवा प्रत्यक्ष किंमत यापैकी जी कमी असेल ती रक्कम | ५ वर्ष सेवा पुर्ण शासकीय संगणक अग्रिम घेतलेले नसावे संपुर्ण सेवा कालावधीत एकदाच देय |
| १४. | २० (४) | एखाद्या वर्गणीदारास एखादी जागा, किंवा घर किंवा सदनिका खरेदी करण्यासाठी किंवा सिडकोमार्फत किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत अथवा एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत किंवा प्रसिद्ध अशा खाजगी ठेकेदारामार्फत बांधण्यात आलेल्या घराकरिता अथवा सदनिकेकरीता कोणताही हप्ता भरावयाचा असेल अशा प्रकरणांत, त्याला जेव्हा जेव्हा हप्ते भरण्यास सांगण्यात येईल त्या त्या वेळी, मंजूर रकमेच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, रक्कम काढण्याची परवानगी देण्यात येईल. | शिल्लक रकमेच्या ३/४ पेक्षा जास्त नाही | २० वर्ष सेवा पुर्ण किंवा सेवानिवृत्ती १० वर्ष बाकी यातील जे अगोदर घडेल तेव्हा प्रत्येक वर्षी काढता येईल |
| १५. | २३ | कोणतेही कारण नमुद न कता | शिल्लक रकमेच्या ९०% | नियत वयोमान निवृत्तीला एक वर्ष बाकी असतांना |

( डॉ. सौरभ त्रिपाठी )
पोलीस अधीक्षक, अहमदनगर

**प्रत,**

सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी अ.नगर जिल्हा
सर्व पोलीस ठाणे/ शाखा प्रभारी अधिकारी अ.नगर जिल्हा